# **14 सितंबर हिन्दी दिवस अहवाल**

**तिथि - 21/9/2022**

**अध्यक्ष -** प्राचार्य दिलीप पाटील
**प्रमुख अतिथि -** डॉ. मोहसिन खान
प्रोफेसर एवं हिन्दी विभागाध्यक्ष
जे. एस. एम. कॉलेज अलीबाग

14 सप्टेबर हा दिवस 'हिंदी दिवस' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून हिंदी विभागाच्या वतीने 'राष्ट्रभाषा हिंदी और राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर पोस्टर स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत एकूण 10 विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे परीक्षण डॉ. अनिल बांगर, प्रा. महेश बिऱ्हाडे व हिंदी शिक्षक श्री. आर. बी. गोसावी यांनी केले. पोस्टर स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे -

प्रथम क्रमांक -- साक्षी कैलास पाटील (प्रथम वर्ष कला)
द्वितीय क्रमांक -- विजया निलेश पाटील (द्वितीय वर्ष कला)
तृतीय क्रमांक -- सायली राजेंद्र पाटील (तृतीय वर्ष कला हिंदी)

दिनांक 21/9/2022 रोजी हिन्दी दिवसाच्या निमित्ताने "राष्ट्रभाषा हिंदी और करिअर की संभावनाएँ" या विषया वर अतिथी व्याख्यानाचे आयोजन केले होते. अतिथी व्याख्यानासाठी जे. एस. एम. कॉलेज अलिबागचे प्रोफेसर व हिन्दी विभागाचे अध्यक्ष डॉ. मोहसिन खान यांना आमंत्रित केले होते.

आपल्या व्याख्यानात त्यांनी हिन्दी भाषेचा ऐतिहासिक काळापासून आढावा घेतला. तसेच अनुवाद, जाहिरात, कार्टून, फिल्म, बँक, सरकारी कार्यालये, शैक्षणिक संस्था इत्यादि ठिकाणी नोकरीच्या संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. जर तुमच्याकडे कौशल्य असेल तर या क्षेत्रात तुम्ही करिअर घडवू शकता व समाजात आपली ओळख निर्माण करू शकता असे ही त्यांनी स्पष्ट केले म्हणून हिन्दी विषयाचे अध्ययन करण्याचे त्यांनी आवाहन केले.

या प्रसंगी पोस्टर स्पर्धेचे बक्षिस वितरण ही प्रमुख अतिथी डॉ. मोहसिन खान व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दिलीप पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन, सुत्रसंचलन हिन्दी विभाग प्रमुख डॉ. संगीता चित्रकोटी यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा. बिऱ्हाडे महेश यांनी मानले.

डॉ. संगीता चित्रकोटी
कार्यक्रम समन्वयक व हिन्दी विभागाध्यक्ष




डॉ. मोहसिन खान यांचे स्वागत करताना महविद्यालयाचे प्राचार्य दिलिप पाटील




डॉ. मोहसिन खान व्याख्यान देताना ...




प्राचार्य दिलिप पाटील अध्यक्षीय भाषण देताना ...




सूत्रसंचलन करताना कार्यक्रम समन्वयक व विभागाध्यक्ष डॉ. संगिता चित्रकोटी



पोस्टर स्पर्धेचे परीक्षण करताना परिक्षक ...




पोस्टर स्पर्धेचे बक्षीस वितरण, प्रथम क्रमांक - साक्षी पाटील [ एफ वाय ]




पोस्टर स्पर्धेचे बक्षीस वितरण, विजया निलेश पाटील




पोस्टर स्पर्धेचे बक्षीस वितरण, तृतीय क्रमांक - सायली पाटील{ टी.वाय. हिन्दी ]



डॉ. अमराभाई चावडा गुजरात यांनी त्यांची पुस्तके महाविद्यालयाला
भेट स्वरुपात पाठवली. हिन्दी दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयाकडे सुपूर्त केली.



‘हिन्दी दिवस’ कार्यक्रमासाठी उपस्थित विद्‌यार्थिनी व प्राध्यापक वर्ग